स्थापना २८.८.१९८९

लक्ष २२५ कोटी...

''जनसामान्यांच्या विश्वासाचं प्रतिक''

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ

* वैयक्तिक कर्ज * गृहतारण कर्ज * वाहन तारण कर्ज
* व्यवसाय कर्ज * बचत योजना * तत्पर ग्राहक सेवा
* लॉकर्स सुविधा * CBS प्रणाली
* NEFT, RTGS व चेक क्लिअरींग सुविधा
* कोणत्याही शाखेतून बँक व्यवहार
* विना विलंब कर्ज वितरण सुविधा
* एस्.एम्.एस. बँकींग सुविधा















सर्वमंगलमाङ्गल्ये शिवे सर्वार्थसाधिके । शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोऽस्तुते ।।

## ३५ वा वार्षिक अहवाल

सन २०२३-२०२४

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ

## संचालक-मंडळ



श्री. जयवंतराव बंडू काटकर
संस्थापक



श्री. प्रकाश पाटील
अध्यक्ष



श्री. मनोहर जाधव
उपाध्यक्ष



श्री. हणमंत घनवट
संचालक



श्री. प्रकाश पवार
संचालक



श्री. हरिश्चंद्र येरूणकर
संचालक



श्री. शशिकांत शिर्के
संचालक



श्री. बाळासाहेब सोनजे
संचालक



श्री. जगदिश मोरे
संचालक



श्री. विजय पाटील
संचालक



श्री. राजेंद्र सोनकांबळे
संचालक



श्री. सुरेश एखंडे
संचालक



श्री. दिलीप पतंगे
संचालक



सौ. वनिता टिळेकर
संचालिका



सौ. शारदा कर्नाळे
संचालिका



सौ. अपुर्वा पाटील
तज्ञ संचालिका



श्री. विवेक फेगडे
तज्ञ संचालक



श्री. सुनिल घनवट
कार्यकारी संचालक
(मुख्य व्यवस्थापक)



श्री. पांडुरंग पाटील
व्यवस्थापक

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ

पत्ता : १०३, साकेत अपार्टमेंट, पहिला माळा, वडवली विभाग, अंबरनाथ (पू.), जि. ठाणे - ४२१५०१.

जा. क्र. - श्री.म.ना.स.प./वा.सर्वसा. सभा नोटीस/७७/२०२४-२०२५ दि. ०६.०८.२०२४

## वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना

**(फक्त सभासदांसाठी)**

स.न.वि.वि.

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ ह्या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, पतसंस्थेची सन २०२३-२४ या वर्षाची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २५.०८.२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. रोटरी क्लब, वडवली विभाग, अंबरनाथ (पू.) येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे. कृपया सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

### सभेपुढील कामकाजाचे विषय

१) दि. २७/०८/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

२) दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाचा, संचालक मंडळाने सादर केलेल्या अहवालास मान्यता देणे.

३) सन २०२३-२४ या वर्षाच्या मान्य अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा ज्यादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.

४) दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाचा, संचालक मंडळाने सादर केलेला ताळेबंद व खर्च-उत्पन्न पत्रकास मान्यता देणे.

५) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफ्याच्या विनियोगास मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.

६) सन २०२४-२५ च्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.

७) सन २०२४-२५ या अर्थिक वर्षासाठी अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणुक करणे व मेहनताना ठरविणे.

८) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणुक करणे व मेहनताना ठरविणे.

९) वाशी, कोपरखैरणे, कळंबोली या परीसरात संस्थेच्या शाखा विस्ताराबाबत विचारविनिमय करणे व ठराव करणे.

१०) मा. अध्यक्षांचे अनुमतीने, आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

सही/-

**सुनिल हणमंत घनवट**

कार्यकारी संचालक

(संचालक मंडळाच्या आदेशानुसार)

### विशेष सूचना

१) गणसंख्येच्या अभावी सभा तहकुब झाल्यास अशी स्थगीत झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी, अर्ध्या तासानंतर त्याच विषयांवर बोलविण्यात येईल. त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.

२) सभेचे कामकाज व्यवस्थित पार पाडता यावे या दृष्टीने, ज्या सभासदांना काही सूचना मांडावयाच्या असतील किंवा प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी आपल्या सुचना अगर प्रश्न सभेच्या ७ दिवस अगोदर लेखी स्वरुपात संस्थेच्या कार्यालयीन वेळेत आणून द्यावेत.

३) सभेस येतांना सभासदांनी आपला अहवाल सोबत आणावा.

**४) दहावी, बारावी, पदवी व समकक्ष उत्तीर्ण सभासद पाल्यांचा गुणगौरव समारंभ-प्रत्यक्ष उपस्थित पाल्यांनाच बक्षिस वितरण केले जाईल.**

**५) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचा अहवाल नजीकच्या शाखेतून घ्यावा.**

**६) सभा संपल्यानंतर सभासदांना भोजन व्यवस्था करण्यात आली आहे.**

# ३५ वा वार्षिक अहवाल, सन २०२३-२०२४

# अध्यक्षीय मनोगत...

सन्माननीय सभासद बंधू आणि भगिनींनो,

सप्रेम नमस्कार,

आपल्या श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी संस्थेच्या ३५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संचालक मंडळाच्या वतीने आपणा सर्वांचे स्वागत करतो. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचा अहवाल आपणासमोर ठेवताना मला आनंद होत आहे. आपणासारख्या आदरणीय सभासदांच्या विश्वासावर आपली संस्था कामकाजाची ३५ वर्षे पूर्ण करून ३६ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. अनेकांचे श्रम, प्रयत्न आणि जेष्ठांचे आशिर्वाद आपल्या संस्थेशी निगडीत आहेत. सर्वसामान्य सभासदांच्या ठेवी विश्वासाने जमा करून ते गरजू सभासदांच्या गरजेच्या वेळी देणे आणि विकासाचे चक्र चालू ठेवणे हेच आपल्या संस्थेचे अखेरचे उद्दीष्ट आहे.

संस्थेनी ग्राहकांना दिलेली दर्जेदार सेवा, ग्राहकांशी जपलेला ऋणानुबंध आणि सभासद, ठेवीदार, हितचिंतक यांनी संस्थेप्रती दाखविलेला विश्वास यामुळे संस्थेने दि. ३१ मार्च २०२४ अखेर रुपये १७६ कोटी ४५ लाखांचा समिश्र व्यवसायाचा टप्पा पूर्ण केलेला आहे. ही बाब संस्थेच्या व आपणा सर्वांच्या दृष्टीने अभिनंदनीय व अभिमानास्पद आहे.

संस्थेतील विविध विभागांचे कामकाज जलद गतीने व सुलभतेने होण्यासाठी संचालक मंडळार्गत असलेल्या कर्जवितरण, कर्जवसुली, लेखापरीक्षण या समितीच्या सभा वेळोवेळी आयोजित करून तत्काळ निर्णय घेऊन कामकाज गतिमान करण्यात येते. त्याचबरोबर संस्थेचे संचालक मंडळ, प्रशासकीय अधिकारी, शाखाधिकारी यांच्या संयुक्तरीत्या, सभा घेऊन उद्दीष्ट्य पूर्तीचा आढावा घेण्यात येत असून आवश्यक तिथे मार्गदर्शन करण्यात येते. संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी वेगवेगळे उपक्रम राबवून एकसंघपणे व आत्मीयतेने काम केल्यामुळेच आपल्या संस्थेची प्रगतीच्या दिशेने सतत वाटचाल चालू आहे.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने रु. ९८ कोटी ९२ लाखाच्या ठेवी व रुपये ७७ कोटी ५३ लाखांचे कर्ज वाटप करून संस्थेला निव्वळ नफा रु. एक कोटी दहा लाख इतका नफा झाला आहे. तसेच नेट एन.पी.ए. चे प्रमाण १.६७% इतके राखून ठेवीदारांना आश्वस्त करून ठेवीच्या सुरक्षिततेची हमी दिली आहे.

तंत्रज्ञानाचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन आपली संस्था गेली अनेक वर्षे ग्राहकांना संगणकाद्वारे सेवा देत आहे. त्यामुळे संस्थेच्या सभासदांना, खातेदारांना तत्पर अचूक व अद्यावत माहिती उपलब्ध होत आहे. बदलत्या जीवनशैलीमध्ये नवनवीन संकल्पना येत असतात. बदलत्या तंत्रज्ञानाचा वापर करून आपली संस्था देखील प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. मोबाईल बँकिंग, आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी, चेक क्लिअरिंग सुविधा, लॉकर्स सुविधा, एस.एम.एस. सुविधा, सभासदांना पुरवल्या जात आहेत.

गेल्या ३५ वर्षाच्या कालावधीत संस्थेने केलेली प्रगती व सतत मिळणारा 'अ' वर्ग तसेच सातत्याने नफ्यातील वाढ ही जमेची बाजू आहे. या प्रदीर्घ कालावधीत संस्थेचे मुख्यालय तसेच पाच शाखा कार्यालये स्वमालकीची असून शहापूर शाखेचे कार्यालय लवकरच स्वमालकीच्या वास्तूत स्थलांतर होत आहे. मुंबई उपनगरीय शहरात सुमारे ५५०० स्क्वेअर फूटच्या स्वमालकीच्या बँकिंग एरियातून संस्था सभासदांना ग्राहक सेवा देत आहे. संस्थेचा प्रगती आलेख उंचावत राहावा यासाठी संस्थेने कोकण विभागीय (ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हे) कार्यक्षेत्र मिळविले असून संस्थेच्या लवकरच वाशी, कोपरखैरणे, कळंबोली या परिसरात शाखा विस्तार करण्याचा मानस आहे.

संचालक मंडळातील एकवाक्यता, ''एक विचार संस्थेच्या प्रगतीचा ध्यास,'' संस्थेचे काम मनापासून करताना, सभासदांचे सहकार्य मिळविण्यात प्रयत्नशील राहणारा सेवक वर्ग, दैनंदिन व मासिक ठेव वसूल करणारे डेव्हलपमेंट (विकास) अधिकारी, दूरदृष्टी असणारे व्यवस्थापन या संस्थेच्या एकत्रित प्रयत्नामुळे संस्था प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. हे करीत असताना अनेक अडचणी आल्या व त्यांचे निराकरण करून पुढील यशस्वी वाटचालीसाठी अनेक मान्यवरांचे मौलिक सहकार्य व मार्गदर्शन लाभले व त्यामुळेच हे सर्व आम्ही करू शकलो. या सर्वांचे आभार मानणे आवश्यक आहे. संस्था सदैव तुमचीच असून तुम्ही संस्थेचे आहात. सर्व विचार प्रवाहांना एकत्रित घेऊन पुढे जायचे आहे. आर्थिक आघाडीवर हे सारे यश मिळवण्यासाठी संचालक व सेवक योगदान देत आहेत. व्यवसायातील आपला वाढता सहभाग हा गुणवत्तेचा पाया आहे. संस्थेच्या संख्यात्मक प्रगती बरोबरच गुणात्मक वाढीसाठी संचालक मंडळ, डेव्हलपमेंट (विकास) अधिकारी व सेवकांसाठी प्रशिक्षण वर्गाचे नियोजन केले आहे.

आपल्या संस्थेला कायम वैभवाच्या शिखरावर विराजमान ठेवण्यासाठी आम्ही सर्वजण कटीबद्ध आहोत. संचालक मंडळाच्या कामकाजावर सदैव सार्थ विश्वास ठेवणाऱ्या सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक या सर्वांना उदंड आयुष्य व सौख्य समृद्धी लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना करून मनोगत पूर्ण करतो. सर्वांचे मी आभार मानतो.

## ❊ शाखा निहाय सांपत्तीक स्थिती -

| शाखा | भाग भांडवल | ठेवी | कर्जे | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|---|---|
| मुख्यालय | ३,१९,४२,६६०.०० | ---- | ---- | ---- |
| अंबरनाथ | ---- | ५५,३९,२८,५६१.२३ | २८,७६,३५,१५९.०० | ५७,१९,३९,०८०.७५ |
| बदलापूर | ---- | २०,२१,८९,१७७.२५ | २०,६४,५८,३००.०० | २५,०९,६१,३९९.६० |
| कल्याण (पू.) | ---- | ४,१८,९७,३००.०० | ८,०१,७२,९५७.०० | ८,२४,६२,३२८.१४ |
| कल्याण (प.) | ---- | ८,८५,३०,४८३.३० | ८,५५,६८,८३०.०० | १५,५०,२०,९२९.५२ |
| टिटवाळा | ---- | ७,९२,९७,६७२.३० | ८,६५,७२,४१४.०० | ९,५५,७४,७०२.०८ |
| शहापुर | ---- | २,३४,०५,३८४.०० | २,८९,०७,१९६.०० | ३,०३,११,८५८.५० |

**आर्थिक वर्ष २०२३- २४ आढावा -** सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात सर्व सभासद व ठेवीदार यांच्या भरघोस पाठींब्यावर आपल्या संस्थेस प्रगती साधता आली हे खालील तुलनात्मक आकडेवारीवरुन स्पष्ट होते.

| तपशील | २०२२-२०२३ | २०२३-२०२४ | रु. लाखात % वाढ / घट |
|---|---|---|---|
| **अ) जबाबदाऱ्या** | | | |
| १) भागभांडवल | २८८.९३ | ३१९.४२ | १०.५५% |
| २) स्वनिधी | ५०९.०६ | ५९१.९२ | १६.२७% |
| ३) ठेवी | ८५२५.३५ | ९८९२.४९ | १६.०३% |
| ४) निव्वळ नफा | ९५.०५ | ११०.६७ | १६.४२% |
| **ब) मालमत्ता** | | | |
| १) कर्जे | ६३५६.४१ | ७७५३.१५ | २१.९७% |
| २) गुंतवणुक | २४४९.६६ | २५६८.३८ | ४.८४% |
| ३) कायम व इतर मलमत्ता | ३०८.६८ | ३५८.१५ | १६.०२% |
| **क) उत्पन्न** | | | |
| १) मिळालेले व्याज | ८४६.८१ | १००५.८५ | १८.७८% |
| २) इतर उत्पन्न | २९.७५ | २९.३३ | -१.४१% |
| **ड) खर्च** | | | |
| १) दिलेली व्याजे | ६६६.१६ | ७६२.०६ | १४.३९% |
| २) सेवक पगार व भत्ते | ४६.९० | ६८.५५ | ४६.१६% |
| ३) इतर खर्च | ५४.८४ | ६०.१५ | ९.६८% |
| ४) तरतुदी | १३.६० | ३४.०६ | १५०.४४% |

**आर्थिक प्रमाणके (सन २०२३-२४) -**

| अ.क्र. | तपशील | आदर्श प्रमाण % | प्रत्यक्ष प्रमाण |
|---|---|---|---|
| अ | **खेळत्या भांडवलाशी प्रमाण** | | |
| | १) वसूल भाग भांडवल | २ ते ४ | २.९०% |
| | २) निधी | ४ ते ६ | ५.३९% |
| | ३) ठेवी | ८० ते ८५ | ९०.१०% |
| | ४) इतर देणी | २ ते ३ | ०.५८% |
| | ५) निव्वळ नफा | १ ते २ | १.००% |
| | ६) रोख व बँकेतील शिल्लक | ४ ते ६ | १.८३% |
| | ७) गुंतवणूक | २५ | २३.३९% |
| | ८) कर्जे | ६० ते ६५ | ७०.६१% |
| | ९) इतर येणी | ६ | १.५६% |
| | १०) एकूण उत्पन्न | ११ | ९.४३% |
| | ११) व्यवस्थापन खर्च | २ | १.२१% |
| ब | १) निव्वळ नफ्याचे उत्पन्नाशी प्रमाण | १० | १०.६८% |
| | २) मुदत ठेवीचे एकूण ठेवीशी प्रमाण | ७०% | ७२.४६% |
| | ३) व्यवस्थापन खर्चाचे उत्पन्नाशी प्रमाण | ३० ते ३५ | १२.८६% |
| | ४) सी.डी.रेशो | ६५ ते ७० | ७०.३५% |
| | ५) निव्वळ अनुत्पादक जिंदगी प्रमाण | ५ | १.६७% |
| | ६) भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) | ९% | ९.०८% |
| | ७) एकूण ठेवीशी तरतला निधीचे प्रमाण (SLR) | २५% | २७.८९% |
| | ८) एकूण ठेवींशी रोखता निधींचे प्रमाण (CRR) | १% | २.१९% |

**१) सभासद व भागभांडवल -** आपल्या संस्थेची सभासद संख्या दि. ३१ मार्च २०२३ अखेर ५१०९ इतकी होती. त्यामध्ये अहवाल साली ५०२ नवीन सभासद करून घेण्यात आले. पैकी १८८ सभासदांनी त्यांच्या सभासदत्त्वांचे राजीनामे दिल्याने या वर्षाअखेरीस ५४२३ एकूण सभासद आहेत.

पतसंस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. ५ कोटी असून अहवाल वर्षात भाग-भांडवलात लक्षणीय वाढ झाली आहे. मागील वर्षी पतसंस्थेचे वसूल भागभांडवल रुपये २,८८,९३,७५०.०० होते. त्यामध्ये वाढ होऊन अहवाल वर्ष अखेरीस वसूल भाग भांडवल रुपये ३,१९,४२,६६०.०० जमा झालेले आहे.

**२) स्वनिधी -** अहवाल सालाच्या सुरूवातीस राखीव निधी व इतर निधी मिळून रूपये ५,०९,०६,१५७/- जमा होते. सन २०२३-२४ अखेरीस त्यात रू. ८२,८६,१६२/- ने वाढ होऊन एकूण रूपये ५,१९,९२,३१९/- इतका स्वनिधी जमा आहे.

**३) ठेवी -** पतसंस्थेविषयी असलेला विश्वास हा ठेवींच्या आकड्यांमध्ये प्रतीत होतो. पतसंस्थेच्या ठेवी गतवर्षी रु. ८५,२५,३५,०१०/- होत्या. त्यामध्ये १६.०३% वाढ होऊन वर्ष अखेर एकूण ठेवी रु. ९८,९२,४८,५७८.००/- झाल्या आहेत. संस्थेच्या विविध ठेव योजनांमध्ये आपण सामील होऊन आपल्या विकासाबरोबर संस्थेच्या विकासास हातभार लावा.

| अ. क्र. | ठेव प्रकार | दि. ३१.०३.२३ अखेर शिल्लक | दि. ३१.०३.२४ अखेर शिल्लक | ठेवीदार | वाढ / घट | प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुदत ठेव | ३४,१८,६९,८४१.०० | ४२,८०,७६,६३१.०० | ४३२८ | ८,६२,०६,७९०.०० | २५.२१% |
| २ | दामदुप्पट ठेव | ४,०६,११,२३१.०० | ३,६७,१३,६८०.०० | ३४३ | -३८,९७,५५१.०० | -९.५९% |
| ३ | स्नेहबंधन ठेव | ..... | १,२७,९३,७८४.०० | १४८ | १,२७,९३,७८४.०० | १००.००% |
| ४ | मासिक मिळकत ठेव | २१,४०,४१,९६०.०० | २५,१३,१३,४४४.०० | १६७६ | ३,७२,७१,४८४.०० | १७.४१% |
| ५ | लॉकर डिपॉझिट | ७,१२,५४०.०० | ७,६५,९००.०० | ९६ | ५३,३६०.०० | ७.४८% |
| ६ | जनविकास ठेव | २,२९,७९,६४८.०० | ३,४७,६६,५२८.०० | २०१० | १,१७,८६,८८०.०० | ५१.२९% |
| ७ | संकल्प ठेव | १,०९,१९,८७५.०० | १,३२,६५,७५२.०० | ५७७ | २३,४५,८७७.०० | २१.४८% |
| ८ | मासिक ठेव | ७०,५०,७४७.०० | ८५,१२,५२३.०० | ७४१ | १४,६१,७७६.०० | २०.७३% |
| ९ | लखपती ठेव | ५८,६८,५७५.०० | ५९,७५,१९५.०० | १४४ | १,०६,६२०.०० | १.८१% |
| १० | पेन्शन ठेव | ११,७२,०३५.०० | ४३,४५६.०० | २ | -११,२८,५७९.०० | -९६.२९% |
| ११ | इच्छापूर्ती ठेव | ११,२१,३६३.०० | १०,४४,५९३.०० | ६२ | -७६,७७०.०० | -६.८४% |
| १२ | बालविकास ठेव | ८,६९,५९२.०० | ६,०४,२४१.०० | ६ | -२,६५,३५१.०० | -३०.५१% |
| १३ | एजंट सुरक्षा ठेव | ४,९८,६९४.०० | ५,५४,५०२.०० | ४३ | ५५,८०८.०० | ११.१९% |
| १४ | बचत ठेव | ४,३८,६९,६४६.४३ | ३,०४,४९,३८८.६८ | ९४०१ | -१,३४,२०,२५७.७५ | -३०.५९% |
| १५ | दैनंदिन ठेव | १६,०९,४९,२६३.०० | १६,४३,६८,९६०.४० | ६७६० | ३४,१९,६९७.४० | २.१२% |
| | **एकूण** | **८५,२५,३५,०१०.४३** | **९८,९२,४८,५७८.०८** | **२६३३७** | **१३,६७,१३,५६७.६५** | **१६.०३%** |

**४) कर्जवाटप - कर्जवसुली -** गतवर्षी रुपये ६३,५६,४१,२२२/- कर्ज येणे बाकी होते. अहवाल वर्षात विविध प्रकारचे जामीनकी व तारणी कर्ज रू. ४४,६७,०४,०६६/- वाटप केले असून अहवाल वर्षात रू. ३०,७०,३०,४३२/- इतके कर्ज वसूल झाले आहे. दि. ३१.०३.२०२४ अखेर रू. ७७,५३,१४,८५६/- इतके कर्ज येणे बाकी आहे. अहवालसाली गतवर्षीपेक्षा २१.९७% कर्जवाटपात वाढ झाली आहे. तसेच संस्थेचे कर्ज व ठेवीचे प्रमाण (C. D. Ratio) ७०.३५% इतके आहे.

थकीत कर्जवसुलीकडे विशेष लक्ष देण्याचा संचालक मंडळाचा प्रयत्न असतो. सर्व प्रकारचे उपाय करून सुद्धा वसुली न झाल्याने नाईलाजाने काही थकीत कर्जदार व त्यांचे जामीनदार यांच्यावर कठोर कारवाई करावी लागते. सहकार कायद्यातील कलम ९१ व १०१ अंतर्गत दि. ३१.०३.२०२३ अखेर ६१ वसुली दाखल्यांची कारवाई चालू होती. एकूण वसुली दाखल्यांपैकी वसुली दाखल्यांची रक्कम रू. २१,९१,०८४/- वसूल झाली असून अहवाल सालाअखेर ५८ वसुली दाखल्यांची वसुलीची अंमलबजावणी सुरू आहे. कर्ज वसुलीचे कामकाज जलदगतीने होण्याकरीता कोकण महीला सह.पतसंस्था फेडरेशन लि. व ठाणे जिल्हा नागरी/पगारदार सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. ठाणे यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यामुळे पतपेढीचा नेट एन्.पी.ए. १.६७% इतका आहे.

**५) संचालक व नातेवाईकांना दिलेली कर्जे -** महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७५ (२) अन्वये संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांना पतपेढीकडून दिल्या गेलेल्या कर्जाची दि. ३१.०३.२०२४ अखेर कोणत्याही प्रकारची कर्ज रक्कम थकबाकी नाही.

| तपशील | ३१.०३.२३ अखेर कर्ज येणे रक्कम | सन २०२३-२४ कर्ज वाटप रक्कम | सन २०२३-२४ मधील वसूल रक्कम | ३१.०३.२४ अखेर शिल्लक | ३१.०३.२४ अखेर थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| संचालक, नातेवाईक | १७,००,०३९.०० | --- | ४,१५,९९६.०० | १२,८४,०४३.०० | ---- |

**६) गुंतवणुक -** सुरक्षितता व विश्वासार्हता या पार्श्वभूमीवर तरलतेपोटी विविध शेड्युल व मोठ्या सहकारी बँकांमध्ये अहवाल साला अखेर रूपये २५,६८,४२,६६१/- मुदतठेवीमध्ये गुंतवणूक करण्यात आली आहे. संस्थेने राखीव निधीची दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि. ठाणे या बँकेत १००% गुंतवणूक केली आहे.

**७) नफा व नफा विभागणी -** अहवाल वर्षात पतसंस्थेस एकूण खर्च व तरतुदी वजा जाता **रु. १,१०,६५,९६९.०१** इतका नफा झाला आहे व मागील वर्षाचा शिल्लक नफा **रु. १०६८.२९** असा मिळून एकूण नफा **रु. १,१०,६७,०३७.३०** इतका नफा झाला आहे. सहकार खाते यांच्या सूचना आणि नियमानुसार एकूण नफ्याची विभागणी संचालक मंडळाने सुचविली आहे. त्यास मान्याता मिळाली अशी विनंती मी, संचालक मंडळाच्या वतीने आपण सर्वांस करीत आहे. त्यास मंजूरी मिळावी.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | राखीव निधी २५ % | रु. | २७,६६,७५९.०० |
| २) | लाभांश १०.२५ % | रू. | ३०,७१,४३६.०० |
| ३) | इमारत निधी | रु. | २५,००,०००.०० |
| ४) | संशयीत व बुडीत निधी | रु. | १५,००,०००.०० |
| ५) | थकीत कर्ज व्याज निधी | रु. | २,७८,५००.०० |
| ६) | गुंतवणूक चढ-उतार निधी | रु. | १,००,०००.०० |
| ७) | सहकार शिक्षण प्रशिक्षण निधी | रू. | २,००,०००.०० |
| ८) | कर्मचारी कल्याण निधी | रु. | १,००,०००.०० |
| ९) | लाभांश समीकरण निधी | रु. | १,००,०००.०० |
| १०) | धर्मदाय निधी | रु. | १,००,०००.०० |
| ११) | व्यवसायवृद्धी व विकास निधी | रु. | २,५०,०००.०० |
| १२) | आकस्मित निधी | रु. | १,००,०००.०० |
| १३) | शिल्लक नफा | रु. | ३४२.३० |
| | **एकूण** | **रु.** | **१,१०,६७,०३७.३०** |

**८) संचालक मंडळ -** संचालक मंडळाच्या वर्षभरात ११ मासिक सभा व २ तातडीच्या अशा एकूण १३ सभा झाल्या आहेत. संस्थेचे दैनंदिन कामकाज पोटनियमांना अनुसरून व सहकारी कायद्याच्या तरतुदीनुसार होण्याच्या दृष्टीकोनातून संस्थेच्या कार्यालयात नियमित येऊन सेवक वर्गाबरोबर योग्य ती सल्लामसलत करून कामकाज हाताळीत असतात. सहकार क्षेत्रात होणारे अमुलाग्र बदल स्विकारून, संस्थेची उज्वल परंपरा राखणे, संस्थेस प्रगतीपथावर नेणे व सर्वसामान्य सभासदांच्या आर्थिक अडचणींचे निवारण करणे या उद्दीष्टांसाठी संचालक मंडळ सदैव कार्यरत असते.

**९) संचालक निवडणूक -** चालू आर्थिक वर्षात पतसंस्थेची सन २०२३-२४ ते सन २०२८-२९ या कालावधीची निवडणूक प्रक्रीया मा. शांताराम चव्हाण निवडणूक निर्णय अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था ठाणे राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या मान्यतेने पार पडली. निवडणूक प्रक्रीया अविरोध झाल्यामुळे नवीन अस्तित्वात असलेल्या संचालक सदस्यांनी दि. ०४/०२/२०२४ रोजी निवडणूक निर्णय अधिकारी मा. शांताराम चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या सभेत अध्यक्ष म्हणून मा. प्रकाश शं. पाटील व उपाध्यक्ष म्हणून मा. मनोहर जाधव यांची बिनविरोध निवड केली.

**१०) कर्मचारी प्रशिक्षण -** आधुनिक तंत्रज्ञानात होणारे बदल तसेच, नियमात वारंवार होणारे बदल यानुसार आपले ज्ञान व माहिती अद्ययावत राहावी या हेतूने प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येते. पतसंस्थांना आकारला जाणाऱ्या आयकरांबाबत, कर्ज वितरण व कर्ज वसुली धोरण, उत्पन्न व खर्च धोरण, गुंतवणूक धोरण, अंतर्गत व्यवस्थापन, सी.आर.आर., सी.आर.ए.आर. इत्यादी विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी पतसंस्था प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करत असते. या अनुषंगाने संस्थेने आपल्या अंबरनाथ शाखेत पतसंस्थेच्या सर्व संचालक, कर्मचारी वर्ग, विकास अधिकारी यांना प्रशिक्षित करण्याचे उद्देशाने स्वतःचे प्रशिक्षण सभागृह तयार केलेले आहे. सभागृहात प्रोजेक्टर सहित, अत्याधुनिक साऊंड सिस्टीम व बैठक व्यवस्था करून महिन्यातील शेवटच्या रविवारी दुपारी ३.३० ते सायंकाळी ६.३० वा. पर्यंत प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले जाते. या प्रशिक्षण वर्गासाठी सहकारतज्ञ म्हणून मा. मधुकरजी बोडके सर फाऊंडर व ट्रेनर सहकार मंच व सी.ई.ओ. महाराष्ट्र मंत्रालय एम्प्लॉयज सोसायटी यांचे विविध विषयावर मार्गदर्शन लाभते.

अहवाल वर्षात संस्थेने सर्व शाखाधिकारी यांना दिनांक २७-०२-२०२४ रोजी आय.जी.एम.एम.प्रा.लि. यांनी कोल्हापूर येथे आयोजित ''गोल्डन की'' या विशेष प्रशिक्षण वर्गासाठी पाठवण्यात आले होते. या वर्गात सोनेतारण जिन्नसाची पारख, सोन्याची शुद्धता, त्यांचे मूल्यांकन आदि विषयांवर प्रशिक्षण व प्रात्यक्षिते देण्यात आली.

दि. ०४-०२-२०२४ व ०५-०२-२०२४ रोजी दोन दिवसीय कर्मचारी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले होते. मा.श्री. संदीपजी पाटील सर को-ऑप.ट्रेनर व लेखक यांनी बिझनेस ग्रोथ २०२४ या विषयाअंतर्गत संस्थेचा सिक्युरिटी इंडेक्स, रेप्यूटेशन इंडेक्स, ठेव सुरक्षितता, संस्थेची गुंतवणूक व लिक्वीडीटी, सरप्लस यांचे आधारे संस्थेची मार्केटींग करून व्यवसाय वृद्धी कशी साधावी यांचे मार्गदर्शन केले.

**११) जनता अपघात विमा -** पतसंस्थेने आपल्या सर्व इच्छुक सभासदांसाठी व कर्जदारांसाठी दि ओरिएण्टल इन्श्युरंन्स कंपनी लि. च्या माध्यमातून वैयक्तिक जनता अपघात विमा पॉलिसी अंतर्गत विमा उपलब्ध करून दिला आहे. या पॉलिसीची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे....

१) किमान रू. १,००,०००/- व कमाल रू. ५,००,०००/- पर्यंत अपघात विमा संरक्षण उपलब्ध.

२) रक्कम रू. ५,००,०००/- च्या विम्यासाठी तीन वर्षाकरीता रू. ८१०/- हप्ता.

३) कोणत्याही कागदपत्रांची आवश्यकता नाही. कुठल्याही प्रकारच्या वैद्यकिय तपासणीची गरज नाही.

**१२) ग्राहक सेवा - सुविधा -** सभासद ग्राहकाला बँकींग मधील सर्व सेवा सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करण्याच्या दृष्टीकोनातून पतसंस्थेने लॉकर्स सुविधा आर.टी.जी.एस्. (RTGS) व एन्.इ.एफ्.टी. (N.E.F.T.) सुविधा व एस्.एम्.एस्. (SMS) बँकींग सुविधा सुरू करण्यात आल्या आहेत.

**१) मोबाईल बँकिंग-** आता आपले बँकिंग व्यवहार आपण घरबसल्या एका क्लिकवर करू शकता. हा आपल्या संस्थेने सभासदांसाठी मोबाईल बँकिंग सुविधा उपलब्ध करून दिली आहे. वेळेची बचत, हवी ती प्रत्येक सुविधा,

सुरक्षितता आणि हव्या त्या क्षणी उपलब्धता ही संस्थेच्या मोबाईल बँकिंगची वैशिष्ट्ये आहेत. श्री महालक्ष्मी पतसंस्थेने मोबाईल ॲप डाउनलोड करा आणि प्रत्यक्ष अनुभव घ्या.

२) **लॉकर्स सुविधा** - आजच्या काळात आपल्या मुल्यवान गोष्टी कुठे ठेवायच्या हा मोठाच प्रश्न असतो. त्या प्रश्नाचे खात्रीशीर उत्तर म्हणजे श्री महालक्ष्मी पतसंस्था आपल्या अंबरनाथ व बदलापूर शाखेतून देत असलेली लॉकर सुविधा आपल्या साधन संपत्तीची काळजी आम्ही पूर्ण जबाबदारीने घेतो. आमच्या सुरक्षित लॉकर सुविधेचा लाभ घ्या आणि निश्चिन्त व्हा.

३) RTGS / NEFT - NEFT/RTGS द्वारे त्वरीत आपल्या शाखेमधून ऑनलाईन पद्धतीने खातेदाराला कोणत्याही बँकेच्या खातेदाराच्या खात्यावर १५ मिनीटात पैसे पाठवता येतात.

४) CHEQUE COLLECTION SERVICE - खातेदाराच्या नावाने असलेले कोणत्याही बँकेचे ५०,००० रु. पर्यंतचे चेक क्लिअरिंग करून मिळतात.

५) CORE BANKING SERVICE - श्री महालक्ष्मी पतसंस्थेच्या सर्व शाखा ऑनलाईन संगणक प्रणालीने एकमेकांना जोडलेल्या आहेत. खातेदार कोणत्याही शाखेमधून आपल्या खात्यावर व्यवहार करू शकतो.

**१३) श्रद्धांजली -** अहवाल सालामध्ये देशातील थोर नेते, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक, शास्त्रज्ञ, जवान, सहकार तज्ञ, आपल्या संस्थेचे मान्यवर सभासद, ठेवीदार, हितचिंतक तसेच नैसर्गिक आपत्तित मृत पावलेल्या अशा थोर विभूती पंचतत्वात विलीन झाल्या त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

**१४) आभार व ऋणनिर्देश -** आपल्या पतसंस्थेत वेळोवेळी ज्या व्यक्तींनी सहकार्य दिले त्यांना ऋणनिर्देश करणे क्रमपात्र ठरेल. मा. श्री. भालेराव विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, मा. डॉ. किशोर मांडे जिल्हा उपनिबंधक सह. संस्था ठाणे, मा. श्री. चेतन चौधरी सहाय्यक निबंधक सह संस्था, अंबरनाथ तालुका, मा. श्री. विशाल जाधवर उपनिबंधक सहकारी संस्था कल्याण तालुका, मा. श्री. शांताराम चव्हाण कार्यालय अधिक्षक जिल्हा उपनिबंधक सह. संस्था ठाणे यांनी पतसंस्थेस बहुमूल्य मार्गदर्शन करून प्रोत्साहित केले. या मान्यवरांची संस्था ऋणी आहे. मा. अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. मुंबई, कोकण महिला सह. पतसंस्था फेडरेशन लि. च्या अध्यक्षा श्रीमती प्रभूघाटे व विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री. प्रकाश निकम व मा. अध्यक्ष व सचिव ठाणे जिल्हा नागरी पगारदार सह. पतसंस्था फेडरेशन, श्री. जी. डी. कुलकर्णी अँड असोसिएट व अधिकारी वर्ग, मे. मोहिते अँड असोसिएट्स (C.A.) व अधिकारी वर्ग ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीचे विकास अधिकारी श्री. एन्. एस्. ढवळे, अॅड. सुधीर जगदाळे, अॅड. हर्षद भोसले, श्री टेक्निकल कन्सल्टंट अँड व्हॅल्यूअर्स चे विजय फाटक यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शन व सहकार्याबद्दल आभार.

पोलीस स्टेशन अंबरनाथ, बदलापूर व कल्याण व डोंबिवली यांनी वसुलीकामी विशेष सहकार्य केल्याबद्दल आभार. पतसंस्थेची संगणक कार्यप्रणाली कार्यन्वित करणारे नेटविन सिस्टीम्स ॲन्ड सॉफ्टवेअर आणि अधिकारी वर्ग, दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि., दि सारस्वत को. ऑप. बँक लि., डोंबिवली ना. सह. बँक लि., कल्याण जनता सह. बँक लि., शामराव विठ्ठल को-ऑप. बँक लि., अंबरनाथ जयहिंद को. ऑप .बँक लि., बॅक ऑफ बडोदा, ठाणे जनता सहकारी बँक लि. तसेच कार्यक्षेत्रातील सर्व सह. पतसंस्था यांचे पदाधिकारी व कर्मचारी वर्गाचे सहकार्याबद्दल आभार.

अंतर्गत हिशोब तपासनीस मा. श्री. आर. के. पाटील (प्रमाणित लेखापाल) व त्यांचे अधिकारी यांनी संस्थेच्या दैनंदिन कामकाजात वेळोवेळी मार्गदर्शन केल्याबद्दल मी खास ऋण व्यक्त करतो. संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संचालक, कर्मचारी, ठेव प्रतिनिधी, सभासद, ठेवीदार आणि हितचिंतक यांनी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन यामुळेच संस्थेने यशस्वी वाटचाल केली आहे या सर्वांचा मी व्यक्तिश: आभारी आहे.

जयहिंद ! जय सहकार !!

आपला

**श्री. प्रकाश शंकर पाटील (अध्यक्ष)**

श्री महालक्ष्मी नागरी सह. पतपेढी मर्या. अंबरनाथ

# परिशिष्ट 'अ'

(रुपये लाखात)

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नाव | : | **श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ** |
| प्रशासकीय कार्यालय | : | १०३, साकेत अपार्टमेंट, पहिला माळा, रोटरी क्लब समोर, वडवली विभाग, अंबरनाथ (पूर्व), जि. ठाणे. |
| नोंदणी क्र. | : | टि. एन्.ए. / यु. एल. आर. / आर. एस. आर. (सी.आर.) / ३७४ / १९८९-९० |
| नोदंणी दिनांक | : | २८ ऑगस्ट १९८९ |
| संस्थेचे कार्यक्षेत्र | : | कोकण विभाग मर्यादित (ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग) |
| शाखा | : | प्रशासकीय कार्यालयासह सहा शाखा<br>१) अंबरनाथ २) बदलापूर<br>३) कल्याण (पू.) ४) कल्याण (प.)<br>५) टिटवाळा ६) शहापूर |
| सभासद संख्या | : | ५,४२३ |
| वसूल भाग भांडवल | : | रु. ३१९.४२ |
| राखीव व इतर निधी | : | रु. ५९१.९२ |
| ठेवी | : | रु. ९८९२.४९ |
| कर्जे | : | रु. ७७५३.१५ |
| गुंतवणुक | : | रु. २५६८.४२ |
| ढोबळ एन्.पी.ए. | : | ४.३३% |
| निव्वळ एन्. पी. ए. | : | १.६७% |
| ऑडीट वर्ग | : | अ |
| अहवाल साली नफा | : | रु. ११०.६७ |
| कर्मचारी वर्ग | : | ३१ |
| खेळत भांडवल | : | रु. १०९७९.०४ |

## ताळेबंद

| रक्कम रु. २०२२-२३ | जबाबदाऱ्या व देणे | | रक्कम रु. २०२३-२४ |
|---|---|---|---|
| ५,००,००,०००.०० | **अधिकृत भाग भांडवल** | | ५,००,००,०००.०० |
| **२,८८,१३,७५०.००** | **वसुल भाग भांडवल** | ३,१९,४२,६६०.०० | |
| **१५,५०७.००** | **भाग अनामत** | ३,१८७.०० | **३,१९,४५,८४७.००** |
| **१,६५,२७,२८३.००** | **राखीव निधी** | १,८९,५०,१०७.०० | **१,८९,५०,१०७.००** |
| **३,४३,७८,८७४.७०** | **इतर निधी** | | |
| ९७,९५,७९२.०० | इमारत निधी | १,१७,६५,९९२.०० | |
| ५,२१,६९७.०० | लाभांश समीकरण निधी | ६,२१,६९७.०० | |
| ५,०६,०८५.०० | सभासद कल्याण निधी | ५,०६,०८५.०० | |
| ४,२५,०००.०० | गुंतवणुक चढ उतार निधी | ५,२५,०००.०० | |
| ७१,४९९.०० | धर्मदाय निधी | १,०१,१९७.०० | |
| ३,५२,५००.०० | कर्मचारी कल्याण निधी | ४,५२,५००.०० | |
| ७,५९,८५०.०० | निवडणूक निधी | ७,१९,५१६.०० | |
| १,५९,९७,९१४.०० | संशयीत व बुडीत कर्ज निधी | १,८२,७९,१९०.०० | |
| २२,६६,३७७.०० | थकीत कर्जव्याज निधी | २६,६१,९७७.०० | |
| १९,०१,५५७.०० | कर्मचारी ग्रॅच्युइटी निधी | २१,०५,३०७.०० | |
| १३,०२,०००.०० | उत्तम जिंदगी तरतूद | १८,५५,०००.०० | |
| २,०५,१५०.७० | सहकार शिक्षण प्रशिक्षण निधी | २,१२,५२८.७० | |
| ७७,४५३.०० | व्यवसायवृद्धी व विकास निधी | २,१५,२२३.०० | |
| १,९६,०००.०० | अकस्मित निधी | २,२१,०००.०० | **४,०२,४२,२१२.७०** |
| **८५,२५,३५,०१०.४३** | **ठेवी** | | |
| ३४,१८,६९,८४१.०० | मुदत ठेव | ४२,८०,७६,६३१.०० | |
| ४,०६,११,२३१.०० | दामदुप्पट ठेव | ३,६७,१३,६८०.०० | |
| २१,४०,४१,९६०.०० | मासिक मिळकत ठेव | २५,१३,१३,४४४.०० | |
| --- | स्नेहबंधन ठेव | १,२७,९३,७८४.०० | |
| १६,०९,४९,२६३.०० | दैनंदिन ठेव | १६,४३,६८,९६०.४० | |
| ७०,५०,७४७.०० | मासिक ठेव | ८५,१२,५२३.०० | |
| २,२९,७९,६४८.०० | जनविकास ठेव | ३,४७,६६,५२८.०० | |
| १,०९,१९,८७५.०० | संकल्प ठेव | १,३२,६५,७५२.०० | |
| ८,६९,५९२.०० | बालविकास ठेव | ६,०४,२४१.०० | |
| ११,२१,३६३.०० | इच्छापूर्ती ठेव | १०,४४,५९३.०० | |
| **७,९८,१५,४१४.७०** | **एकूण बेरीज पुढील पानावर चालू** | | **९,११,३८,१६६.७०** |

# पत्रक (दि. ३१.०३.२०२४ अखेर)

| रक्कम रु. २०२२-२३ | मालमत्ता व येणे | | रक्कम रु. २०२३-२४ |
|---|---|---|---|
| **१६,५३,७७०.००** | **रोख शिल्लक** | | **१३,७१,३१५.००** |
| **२,०७,५५,६४१.१२** | **बँक शिल्लक** | | **१,८७,७१,१५८.५८** |
| **२४,८९,६६,६६१.००** | **गुंतवणूक** | | |
| ५,०००.०० | भाग | ५,०००.०० | |
| १,६५,२७,३००.०० | राखीव निधी | १,८९,५२,३००.०० | |
| २३,२४,३४,३६१.०० | मुदत ठेवी | २३,७८,८५,३६१.०० | **२५,६८,४२,६६१.००** |
| **६३,५६,४१,२२२.००** | **कर्जे** | | |
| | **विनातारणी कर्ज** | | |
| ४,८५,५७,४८२.०० | मध्यम मुदत कर्ज | ४,२६,९९,३९७.०० | |
| २,८२,२६,७४२.०० | व्यवसाय कर्ज | ४,११,४५,१००.०० | |
| ५,९८,४१४.०० | तातडीचे कर्ज | ७,१५,८३०.०० | |
| ६०,३२,९४४.०० | नाममात्र सभासद कर्ज | ७२,१६,६०२.०० | |
| | **तारणी कर्ज** | | |
| ९,३१,९६,९५७.०० | गृहतारण कर्ज | १२,२०,०५,१९४.०० | |
| २९,८२,८१,०३७.०० | व्यवसायिक (मॉर्गेज) कर्ज | ३७,८४,१३,२८६.०० | |
| २,२९,९५,४९६.०० | सोने तारण कर्ज | २,२७,४४,१६५.०० | |
| १,१३,७२,८२२.०० | वाहन तारण कर्ज | १,१२,१२,८५०.०० | |
| ७,७४,०९,४७९.०० | मुदत ठेव तारण कर्ज | ७,७०,८८,३२२.०० | |
| १,९१,५९९.०० | दैनंदिव ठेव तारण कर्ज | २,२९,१९१.०० | |
| ४,६८,६८२.०० | वस्तू खरेदी तारण कर्ज | ६,७४,६५६.०० | |
| ६,९२,२६८.०० | एन्. एस. सी्. तारण कर्ज | ९,६२,२८३.०० | |
| ४,५८,१९,४७०.०० | महालक्ष्मी सुवर्णतारण कर्ज | ४,६६,६३,०९०.०० | |
| ... | पगार कपात कर्ज | २,००,२८,५००.०० | |
| १७,९७,८३०.०० | कर्मचारी मध्यम मुदत कर्ज | १८,२१,६२८.०० | |
| ... | कर्मचारी गृहतारण कर्ज | १६,९४,७६२.०० | **७७,५३,१४,८५६.००** |
| **९२,९२,७५,६५०.१२** | **एकूण बेरीज पुढील पानावर चालू** | | **१०५,२३,०८,७१०.५८** |

## ताळेबंद

| रक्कम रु. २०२२-२३ | जबाबदाऱ्या व देणे | | रक्कम रु. २०२३-२४ |
|---|---|---|---|
| **७,९८,१५,४१४.७०** | **मागील पानावरुन** | | **९,११,३८,१६६.७०** |
| ५८,६८,५७५.०० | लखपती ठेव | ५९,७५,१९५.०० | |
| ४,९८,६९४.०० | एजंट सुरक्षा ठेव | ५,५४,५०२.०० | |
| ११,७२,०३५.०० | पेंशन ठेव | ४३,४५६.०० | |
| ७,१२,५४०.०० | लॉकर डिपाझिट | ७,६५,९००.०० | |
| ४,३८,६९,६४६.४३ | बचत ठेव | ३,०४,४९,३८८.६८ | **९८,९२,४८,५७८.०८** |
| **६७,३०,६२४.५०** | **देणी व तरतुदी** | | |
| २,५७,२४०.०० | ऑडीट फी | ६,५५,०००.०० | |
| ५०,०८१.०० | अंतर्गत लेखा परी. फी. | ६०,०८१.०० | |
| ३,३०,५९१.०० | सानुग्रह अनुदान | ४,१५,८६४.०० | |
| ९१,९७५.०० | टि.डी.एस्. | ३०,७४१.०० | |
| २०,८८,२७३.५० | देणे लाभांश | २०,९०,७८८.५० | |
| १,२९,८५६.०० | अनामत | १,७८,९५८.०० | |
| ३७,१६,३३०.०० | सिक्युरिटी अनामत | २९,७८,६९२.०० | |
| ६६,२७८.०० | सभासद विमा खाते | ४०,३३८.०० | **६४,५०,४६२.५०** |
| **९५,०५,५५६.२९** | **नफा** | | |
| | मागील शिल्लक नफा (२२-२३) | १,०६८.२९ | |
| | चालू वर्षाचा नफा (२३-२४) | १,१०,६५,९६९.०१ | **१,१०,६७,०३७.३०** |
| **९४,८५,८६,६०५.९२** | **एकूण** | | **१०९,७९,०४,२४४.५८** |

## पत्रक (दि. ३१.०३.२०२४ अखेर)

| रक्कम रु. २०२२-२३ | मालमत्ता व येणे | रक्कम रु. २०२३-२४ |
|---|---|---|
| १२,१२,७५,६५०.१२ | मागील पानावरुन | १०५,२३,०८,७१०.५८ |
| २,२२,५८,३४८.०० | स्थावर मालमत्ता (इमारत) | २,१७,०१,८८१.०० |
| ५५,०७,११०.०० | फर्निचर व डेडस्टॉक | ५१,२२,११२.०० |
| २,०३,१२४.०० | संगणक प्रणाली | २,५०,११८.०० |
| ६,३०,१८२.०० | वाहन खरेदी | ११,५२,१०३.०० |
| १,८१,६२०.०० | स्टेशनरी साठा | २,०८,८७५.०० |
| ९,५००.०० | टेलिफोन अनामत | ९,५००.०० |
| ५,०००.०० | बी.इ.एस्.टी. अनामत | ५,०००.०० |
| ४,७९०.०० | वीज अनामत | ४,७९०.०० |
| १,८५०.०० | भारत गॅस डिपॉझिट | १,८५०.०० |
| ४१,७३०.०० | मुद्रांक शुल्क | ६९,९१०.०० |
| ४,२३,६३९.०० | १०१ कारवाई खर्च | ६,५८,८८३.०० |
| १२,३२,५९२.०० | इन्कम टॅक्स | १२,३२,५९२.०० |
| ३६,९६,६९६.०० | बँक टी.डी.एस्. | ५२,८८,२१५.०० |
| ५७,७१,४४२.०० | गुंतवणुकीवरील येणे व्याज | ३२,५९,५६८.०० |
| १५,००,०००.०० | ॲडव्हान्स | ६५,२९,२४९.०० |
| १,००,०००.०० | कार्यालय ठेव | १,००,०००.०० |
| १४,८५,८६,६०५.१२ | एकूण | १,०१,७१,०४,२४४.५८ |

| श्री. सुनिल ह. घनवट | श्री. मनोहर पां. जाधव | श्री. प्रकाश शं. पाटील |
|---|---|---|
| (कार्यकारी संचालक) | (उपाध्यक्ष) | (अध्यक्ष) |

## उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२०२३ ते ३१/३/२०२४ अखेर

| रक्कम रूपये २०२२-२३ | खर्च | | रक्कम रूपये २०२३-२४ |
|---|---|---|---|
| **६,६६,१६,३४४.८१** | **अ) व्याज खर्च** | | |
| ५,८७,८६,९४६.०० | १) ठेवीवरील व्याज | ६,६८,३०,०१७.९० | |
| ६,२६८.८१ | २) बँक चार्जेस | ३,३८८.०९ | |
| १९,९३८.०० | ३) बँक कर्ज व्याज | ४,४७,४०२.०० | |
| ७८,०३,१९२.०० | ४) दैनंदिन ठेव कमिशन | ८९,२५,४८४.०० | **७,६२,०६,२९१.९९** |
| **४६,९०,८७९.००** | **ब) व्यवस्थापकीय खर्च (ब-१)** | | |
| ४६,७३,७०७.०० | १) सेवक पगार | ६७,९२,१२३.०० | |
| १७,१७२.०० | ३) कर्मचारी गणवेश | ६३,३००.०० | **६८,५५,४२३.००** |
| **१५,६५,७९६.००** | **ब-२)** | | |
| २८,७१६.०० | १) पोस्टेज खर्च | ३५,३११.०० | |
| ६,४४,३०८.०० | २) स्थावर मालमत्ता विमा खर्च | ७,२८,७५१.०० | |
| १,१५,१४०.०० | ३) संगणक/इन्व्हरर्टर देखभाल दुरुस्ती | १,३७,४५७.०० | |
| ३,३७,७४०.०० | ४) वीज बील | ४,०१,८४०.०० | |
| ३९,४३०.०० | ५) टेलीफोन बिल | ३४,८०४.०० | |
